# ग्राहकांसाठी अटी आणि शर्ती

एका ग्राहकाच्या नात्याने तुम्ही जिओ मनी खाते उघडू शकता, आणि जिओ मनी सर्व्हिसेसच्या सुविधा प्राप्त करु शकता, ते या प्रकारे की, तुम्ही खालील अटी आणि शर्ती मान्य करुन त्या विकत घ्याव्यात, किंवा (I Agree) ''मला मान्य आहे'' चे बटन दाबुन सेवा कार्यरत करा, हे बटन RPSL मोबाईल ॲपच्या अटी आणि शर्ती शेवटी दिले आहे, www.jeomoney.com या (वेबसाईट) वर किंवा ग्राहक-ॲपलिकेशन फार्म प्रत्यक्ष भरु शकता, तुमचे हे अटी व शर्तींचे मान्य करणे, स्विकारणे अनकंडिश्नल असेल, तसेच अमर्यादित आणि समर्थतनीय असेल.

तुम्ही हे सुध्दा घोषित कराल की, जी माहिती तुम्ही पुरविली आहे आणि/किंवा स्वप्रमाणित KYC च्या प्रती, या संदर्भात रजिस्ट्रशनसाठी, जिओ मनी खाते उघडण्यासाठी, आणि जिओ मनी वॅलेटसाठी जमा केलेली कागद-पत्रे दुरुस्त आणि खरी-खुरी, वॅलिड असली पाहिजेत, आणि बाब कोणतीही असली तरी हीच प्रक्रिया RPSL विषयी राहील, तुम्ही याला दुजोरा दिला आणि मान्य केले की, जी कागद-पत्रे तुम्ही येथे जमा केली गेली आहेत, ती RPSL द्वारे वापरली जाऊ शकतात, म्हणजे KYC च्या सर्व गरजां आणि आवश्यकता संबंधित ज्या गोष्टी आहेत त्यांचे पालन होऊ शकेल.

१. **व्याख्या**

(a) **''लागू कायदे''** म्हणजे कोणतीही सूचना, कायदा, नियम, आदेश, रुल, निर्णय, नोटीस, सामान्य कायद्याचे नियम, हुकुम, कोर्ट-आदेश, उप-नियम, सरकारी मान्यता, मार्गदर्शक सूचना, गरजा किंवा दुसरे सरकारी निर्बंध, किंवा या सारखे इतर निर्णय कोण्त्याही दृढतेसह, किंवा कोण्त्याही खुलास्यासह, पॉलिसी किंवा शासन ज्याच्याकडे, त्याला आमलात आणण्यासाठी कायदा लागू करण्यासाठी शक्ती आहे,, कोणत्याही सरकाराद्वारे, अधिकारा मार्फत किंवा नियमांनुसार ज्यांच्याकडे अशा विषयींच्या तोडग्यासाठी न्यायालय सुविधा प्राप्त आहे, जी सध्या कार्यरत आहे की, या अटी-शर्तींना आता किंवा नंतर आमलात आणू शक्ते आणि तीचा समावेश RBI मार्गदर्शक सूचनांनमध्ये तसेच KYC च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आहे.

(b) **अर्जदार:** म्हणजे कायद्यानुसार आणि प्राकृतिक व्यक्ती, ज्याने जिओ मनी ॲप अर्ज केला आहे.

(c) **एजंट/डीलर :** म्हणजे ते एजंटस् आणि डीलर्स, ज्यांची नियुक्ती RPSL ने या सहाय्यतेकरिता केली आहे की, जिओ मनी संबंधित कार्य स्वत:कडे घेऊन व्यवस्थित करावे त्यामध्ये उप-एजंट यांचा देखिल समावेश आहे. ज्यांची नियुक्ती आमचे एजंटस्/डीलर्स याच कामांसाठी करतात.

(d) **ग्राहक :** याचा अर्थ असा होतो की, तो अर्जदार आहे ज्याने, ग्राहक अपलिकेशन फार्म CAF जमा केला असून आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तत: केली आहे, आणि त्या बाबी कायद्यानुसार योग्य आहेत. RPSL तर्फे RBI च्या सूचना प्रमाणे, जिओ मनी सर्व्हिसेसची सुविधा प्राप्त करण्यासाठी, त्यांच्या मोबाईल वर आणि इतर माध्यमाद्वारे प्राप्त, RBI आणि KYC च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले आहे.

(e) **''ग्राहक ॲपलिकेशन फार्म'' / ''CAF''** चा अर्थ होतो की RPSL चा अर्ज भरुन, सही करुन, व्यवस्थित-रित्या, अर्जदाराने संबंधित ख-या खु-या कागद-पत्रा सह जमा करावा, ऑनलाईन किंवा मोबाईल ॲपलिकेशन द्वारे किंवा प्रत्यक्ष ॲपलिकेशन फार्म भरुन एजंट कडे, त्याच्या ठिकाणी किंवा दुस-या अशा ठिकाणी जेथे ही सुविधा प्रदान केली गेली आहे अर्ज जमा करावा.

(f) **KYC चे संपूर्ण खाते** : याचा अर्थ असा होतो की जिओ मनी खाते, सांगितल्या प्रमाणे नियमांचे पालन करुन वापरले जात आहे. ते व्यवस्थित म्हणजे दर्शित नियमानुसार ख-या खु-या ओळख-पत्रांसह वापरले जात आहे, ज्यामध्ये रहिवाशी-पत्ता तसेच KYC संदर्भात दिलेला तपशील, KYC मार्गदर्शना-प्रमाणे घेतला आहे.

(g) **''जिओ मनी वॅलेट''** याचा अर्थ असा होतो की सर्व साधनांची प्राप्ती करणारी व्यक्ती, जी साधने RPSL ने दिली आहेत, किंवा इतर साधने जी ग्राहकाने वाढविली आहेत. जिओ मनी खाते, जिओ मनी मोबाईल ॲप द्वारे, किंवा दुस-या माध्यमांद्वारे ज्यांची सुविधा दिलेली आहे आणि त्यांना RPSL ची परवानगी आहे प्राप्त केले जाऊ शकते, (या पत्त्यावर विझिट करा www.jeomoney.com)

(h) ''**जिओ मनी अकाउंट**'' म्हणजे एक प्रिपेड अकाउंट, KYC फुल अकाउंट असो किंवा, लो KYC अकाउंट, जे ग्राहकाच्या नावांवर, त्याच्या मोबाईल ॲप, किंवा त्याच्या दुस-या इतर चॅनलवर, जिओ मनी सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी उघडले आहे, ज्यामध्ये RBI आणि RPSL च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले आहे.

(i) **''जिओ मनी सर्व्हिसेसे''** किंवा ''**सर्व्हिसेस**'' याचा अर्थ असा होतो की प्रिपेड आणि/किंवा इतर सर्व्हिसेस जी RPSL ने ऑफर केली आहेत, जिओ मनी वॅलेट/जिओ मनी अकाउंट वापरण्यासाठी.

(j) **KYC मार्गदर्शक सूचना**/''KYC'' म्हणजे तुम्ही तुमच्या ग्राहकाला ओळखा (KYC) च्या मार्गदर्शक सूचना, आमच्या ऑफिस तर्फे पुढील प्रकारे दिले आहेत.

(k) **लहान KYC खाते** : याचा अर्थ असा होतो की जिओ मनी खाते, नियमानुसार उघडले आहे, रेग्युलेटरी तर्फे सर्व बाबींची पुर्तत: झाली आहे, परंतु खातेदाराचा संपूर्ण तपशील त्यात नोंदविलेला नाही. फक्त ग्राहकाचे नांव, जन्म-तारीख आणि मोबाईल नंबरची नोंद आहे तसेच RPSL च्या पॉलीसीनुसार आवश्यक माहिती जमा आहे.

(l) **''मायनर''** म्हणजे जी व्यक्ती १० (दहा) वर्षा पेक्षा मोठी आणि १८ (अठरा) वर्षा पेक्षा लहान आहे.

(m) **''मायनर गार्डियन''** म्हणजे ती व्यक्ती जी नैसर्गिक रित्या किंवा कायद्याने मायनरची पालक आहे.

(n) **''मर्चंट इस्टॅबलिशमेन्ट''** म्हणजे ते फिजिकल व्यापारी आणि / ज्यामध्ये स्थानिक व्यापा-यांचा समावेश होतो, तसेच ई-कॉमर्स व्यापा-यांचा, आणि इतर कोणतेही दुकानदार ज्यांना जिओ मनी वॉलेटचा आणि/किंवा जिओ मनी अकाउंटचा वापर करुन पेमेंट स्विकारण्याची RPSL ने परवानगी दिली आहे,

(o) **''पेमेंट बॅंक एन्टिटि''** म्हणजे RPSL ची ती प्रत्येक व्यक्ती/संस्था ज्याला रिझर्व्ह बॅंके तर्फे, बॅंक-पेमेंट ची परवानगी मिळाली आहे.

(p) ''**RBI गाईड लाईन्स**'' म्हणजे ज्या मार्गदर्शक सूचना, नियम, कायदे, आदेश, हुकुम, निवेदन रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया ने (RBI) तसेच KYCने प्रिपेड-साधन वापरण्यासंदर्भात दिले आहेत.

(q) **''RPSL''**म्हणजे रिलायन्स पेमेंट सोल्युशन लिमिटेड, ही कंपनी भारतात कार्यरत असून तिचे रजिस्टर्ड ऑफिस - कोर्ट-हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०000२ येथे आहे.

(r) **''ट्रान्झॅक्शन्स''** म्हणजे ते सर्व आर्थिक व्यवहार जे, जिओ मनी खात्याद्वारे झाले, ज्यामध्ये त्या सर्व व्यवहारांचा देखिल समावेश आहे जे ग्राहकाने स्वत: केले किंवा त्याच्या तर्फे दुस-या व्यक्तीने केले.

२. **सामान्य शर्ती**

(a) अशा प्रकारे ग्राहक RPSL ला, जिओ मनी सर्व्हिसेस, जिओ मनी अकाउंट प्रदाण करण्यासाठी अधिकृत करतो, त्या करिता सेवा पुरविण्याच्या काळात ग्राहकाचा मोबाईल नंबर चालू असला पाहिजे, ग्राहकावर हे बंधनकारक आहे की, त्याने त्वरीत RPSL ला लिखित स्वरुपात, जर काही बदल झाला असेल, जसे रद्द करणे, बंद करणे किंवा मोबाईल नंबर जमा करणे, अशा बाबी संदर्भात, ग्राहकाच्या नेहमीच्या रहिवाशी पत्त्यात आणि/किंवा संभाषण-पत्त्यात आणि/किंवा दुस-या कोणत्याही संबंधित बाबी संदर्भात, कळवावे, आणि KYC ची सहाय्यक पुष्टी करणारी कागद-पत्रे, ज्यांची आवश्यकता वेळोवेळी भासू शकते RPSL कडे जमा करावीत.

(b) ग्राहकाला हे स्पष्ट करणे बंधनकारक आहे की, त्याच्याकडे दुसरे कोणतेही जिओ मनी अकाउंट नाही.

(c) ग्राहकाला हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, तो एक प्रबल-बुध्दीचा मानुस आहे.

(d) ग्राहकाला जिओ मनी सर्व्हिसेसचा वापर कोणत्याही बेकायदेशीर कृतींसाठी करता येणार नाही, ज्यामुळे कायद्याचे उल्लंघण होईल. पब्लिक पॉलिसीला ईजा पोहोचेल किंवा जी पॉलिसी, RPSL च्या विरुध्द किंवा तिच्या गुडविल ला घातक असेल.

(e) RPSL जिओ मनी वालेट, जिओ मनी अकाउंट आणि जिओ मनी सर्व्हिसेस सुविधा फक्त तेंव्हाच प्रदाण केली जाते, जेंव्हा या नियमांचे, अटी-शर्तीचे पालन केले जाते.

(f) ग्राहकाला जिओ मनी सर्व्हिसेस सुविधा दिली जाईल, परंतु जे लहान KYC खातेदार आहेत त्यांना मर्यादित स्वरुपात आणि या बांधिलकीसह की ते लागू नियमांचे पालन करतील, या अटी-शर्ती वर दिले जाईल, जेंव्हा ते लहान KYC साठी, आवश्यक कागद-पत्रांची नियमांची पुर्तता कायद्यानुसार करतील. कागद-पत्राची यशस्वी पुर्तता आणि फेर-तपासनी झाल्यानंतर, फुल KYC खाते उघडता येईल, प्रत्येक खातेदाराला आवश्यक त्या बाबींची पुर्तता यशस्वीपणे करावीच लागेल, त्यानंतर फुल KYC खाते उघडेल.

(g) लहान KYC ची सुविधा, फक्त लहान मुलांना RPSL द्वारे दिली जाईल, अधिकता प्राप्तीसाठी बालक आपली आवश्यक ती कागद-पत्रे, आपल्या विषयीची सर्व माहिती, जसी RPSL ला आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी तसेच आवश्यक माहिती घेऊन जिओ मनी सर्व्हिसेस चालू ठेवण्यासाठी गरज पडेल, जमा करतील.

(h) कोणत्याही स्थानिक डीलर कडून जिओ मनी सर्व्हिसेस सुविधा प्राप्त करण्यासाठी, ग्राहकांना अधिकृत रिटेल डीलर्सना भेटावे लागेल, ज्यांची नियुक्ती RPSL ने केली असेल, आणि त्यांच्याकडे व्यवस्थित ऑफिस तसेच जिओ मनी सर्व्हिसेसचे लोगो आणि ब्रॅन्ड सिमबॉल्स असेल.

(i) ग्राहक, पुर्णतः मोबाईल पिन आणि/किंवा कोड आणि/किंवा पासवर्ड आणि/किंवा कार्ड पिन (आणि ती सर्व साधने ज्यांचे वर्णन**"Authentication Pin"** या स्वरुपात झाले आहे) ते RPSL तर्फे अटी-शर्तीच्या काळात ज्या अटी-शर्ती मजकूर आहेतप्रदान करण्यात आले. ही ग्राकाची संपूर्ण जबाबदारी असेल की त्याने त्यांचा वापर आपल्या जबाबदारीवर करावा, तसेच तिचे रहस्य राखावे आणि **"Authentication Pin"** ला सम्मान देऊन संरक्षण करावे. ग्राहकाने हे कोडे केणा समोर उघडु नये, कोणत्याही व्यक्तिला दाखवु नये,आणि कोणत्याही एस.एम.एस/ई-मेल/फोन कॉल/ इत्यादिंना उत्तर देऊ नये, ज्या द्वारे पिनकोड विषयी विचारपुस केली जाईल. RPSL कोणत्याही परिस्थितीतयाला जबाबदार राहणार नाही, जर **Authentication Pin** चे रहस्य आणि कोडे उघडले, तसेच त्यामुळे होणा-या नुकसानाला RPSLजबाबदार राहणार नाही. ग्राहक हाच जिओ मनी अकाउंट आणि जिओ मनी वालेट संबंधित गैरव्यवहाराला जबाबदार असेल, त्याच्या परवानगीने व्यवहार झाले असोत किंवा त्याच्या परवानगी शिवाय.

(j) ग्राहकाला हे मान्य आहे की, जिओ मनी सर्व्हिसेस खाते ट्रान्सफर होत नाही

(k) ग्राहकाला प्रत्येक व्यवहारापुर्वी, आपल्या जिओ मनी अकाउंट मध्ये पुरेशे पैसे आहेत की नाही, हे निश्चित करणे बंधनकारक आहे (ज्यांमध्ये सर्व्हिस खर्चाच, जर असेल समावेश आहे) ग्राहक RPSL च्या अधिका-याला आपल्या आर्थिक व्यवहारां संबंधी खात्री पटवून देईल, ज्यासाठी Authentication Pin चा वापर करेल.
जर काही नुकसान झाले तर, ग्राहक लगेच कस्टमर केअर सेंटरला, त्या नंबर वर जे वेबसाईट वर दर्शविले आहेत, फोन-कॉल करेल त्या, आणि ''तक्रार'' नोंद करेल. तसेच अशा प्रकारची लिखित तक्रार रजिस्टर करेल, किंवा ई-मेल वर, किंवा ऑनलाईन प्रयाप्त फार्म वर, किंवा मोबाईल ॲप वर जे फार्म प्रयाप्त आहे त्यावर, किंवा डीलर मार्फत.

(l) जर काही नुकसान आणि/किंवा चोरी किंवा मोबाईलची चोरी/मोबाईल फोन कनेक्शन बाबत, जिओ मनी कार्डची प्रत्यक्ष चोरी झाली असेल तर, जेंव्हा ही खबर प्राप्त होईल. RPSL त्वरीत पुढील कारवाई करेल, म्हणजे जिओ मनी अकाउंट वर आर्थिक ट्रान्झॅक्शन थाबवेल, RPSL ची ही जबाबदारी राहणार नाही की जे ट्रान्झॅक्शन बेकायदेशीर झाले असेल, तसेच या परिस्थितीची माहिती देण्या पुर्वीचे, जिओ मनी अकाउंट द्वारे जे ट्राझॅक्शन झाले असतील त्याला फक्त ग्राहकच जबाबदार असेल.

(m) जी माहिती ग्राहकाद्वारे, जिओ मनी सर्व्हिसेसचा वापर करताना दिली जाईल, ती तीस-या पार्टीशी, RPSL द्वारे शेअर केली जाईल. जिओ मनी सर्व्हिसेसची सुविधा प्राप्त करण्यासाठी enter-alia करा, ग्राहकाला हे माहित आहे की, प्रत्येक माहिती जी RPSL ला दिली आहे, या उद्देशाने की जिओ मनी अकाउंट मिळावा, ती RPSL कडे राहील, तपासली जाईल. (बाब कोणती ही असो) तिचा वापर RPSL करेल, ज्यामध्ये हे स्पष्ट होईल की कोणत्याही लागू कायद्याचे उल्लंघण होत नाही.

## ३. अतिरिक्त शर्ती

(a) कोणताही ग्राहक, एकापेक्षा जास्त वालेट आपल्या नावांवर घेऊ शकणार नाही, जिओ मनी अकाउंटचा वापर फक्त भारतीय रुपये च्या ट्रान्झॅक्शनसाठीच करता येईल. दुस-या कोणत्याही विदेशी करन्सीसाठी, त्याचा वापर करता येणार नाही, रोख रक्कम जिओ मनी अकाउंट मध्ये भरता किंवा काढता येणार नाही.

(b) RPSL कोणतीच आणि कसलीच गॅरंटी, वॉरंटी प्रस्तुती, किंवा सर्व्हिसेसची जबाबदारी घेत नाही, ज्यांचे येथे वर्णन झाले नाही. RPSL कोणत्याही तीस-या पार्टीची जबाबदारी स्विकारत नाही, म्हणजे डिस्ट्रीब्युटर्स, रिटेलर्स, व्यापारी संकुल इत्यादी, जे काही चांगले वाईट घटेल त्याला तुम्ही आणि ते जबाबदार असणार, म्हणजे ज्या सर्व्हिसेस प्रत्यक्ष RPSL ने दिल्या नाहीत, त्यांना आम्ही जबाबदार राहणार नाही.

(c) RPSL ग्राहकांना, किंवा दुस-या कोण्याही व्यक्तीला, कोण्त्याही चुकीच्या माहितीसाठी, जी ग्राहकाने RPSL ला पुरविली आहे, जबाबदार नाही, जी जिओ मनी सर्व्हिसेस संदर्भात असेल जसे उशीर होणे, व्यापारात तोटा होणे, नफा कमी होणे, टॅक्स किंवा गुडविल ला ईजा पोहोचने, सेव्हिंग चे नुकसान, टूट-फुट, फीसच्या किंमती, खर्च, तसेच कोणताही अप्रत्यक्ष तोटा, हे न पाहता की तो कसा झाला /किंवा जिओ मनी सर्व्हिसेसच्या वापरामुळे झाला असला तरी, किंवा अन्य इतर कारणाने, त्याला आम्ही जबाबदार नाही.

(d) जे आर्थिक व्यवहार व्यापारी संकुलात आणि/किंवा डीलर स्थानांवर झाले असतील, त्या बाबत ग्राहकांची स्वतःची जबाबदारी आहे की, त्यांनी स्वतःला निश्चित करावे, की त्याचे ट्रान्झॅक्शन यशस्वी झाले आहे, ज्याचे नोटिफिकेशन प्रत्येकाला दिले जाते. RPSL याची प्रशंसा करते की ट्रान्झॅक्शन ची माहिती ग्राहकांना आवश्य मिळावी, तरी देखील ती ग्राहकापर्यंत पोहोचला की नाही, याची जबाबदारी घेत नाही. कोणतीही रक्कम जी ग्राहकाच्या चुकीने ट्रान्सफर झाली असेल, आणि ती कोण्या व्यापा-याकडे गेली असेल तर ती RPSL तर्फे, कोणत्याही परिस्थितीत ग्राहकाला परत केली जाणार नाही, RPSL कोणत्याही बेकायदेशीर ट्रान्झॅक्शनला, जे जिओ मनी अकाउंट मध्ये झाला असेल जबाबदार राहणार नाही. जर काही वाद निर्माण झाला तर, RPSL चे रिकार्ड ऑफिस, ट्रान्झॅक्शन संबंधी सर्व माहिती पुरवेल आणि त्यानुसार ग्राहक आणि व्यापारी आपला वाद आपसात मिटवतील.

(e) कोणत्याही परिस्थितीत RPSL याला जबाबदार नसेल की, ग्राहकाने व्यापा-या कडून अमुक वस्तु किंवा सेवा घेतली आणि त्यामध्ये सर्व्हिसेसचा वापर झाला म्हणून, तसेच कोणत्याही आकारासाठी, टॅक्स असो किंवा दुस-या मागण्या, ज्या ट्रान्झॅक्शन संदर्भात असतील. फक्त आणि फक्त व्यापारी संकुलच, ग्राहकांच्या तक्रारीला जबाबदार राहील. जसे (१) जी माहिती ग्राहकांना व्यापा-या तर्फे पुरविली गेली, त्या संदर्भात ज्या तक्रारी असतील, त्यांना (२) ज्या उत्पादनाचे किंवा सर्व्हिसेसचे आश्वासन व्यापा-या तर्फे दिले गेले. (३) उत्पादनाची विक्री आणि पोहोच किंवा सर्व्हिसेस (४) प्रोमोशनल ऑफर्स आणि स्कीम्स, ज्या मध्ये व्यापा-या तर्फे दिलेल्या कूपन्सचा समावेश आहे, RPSL कोणत्याही अशा वस्तूंचे आश्वासन, प्रोत्साहन देत नाही, आणि पुढाकार घेत नाही.

(f) RPSL दुस-या वेबसाईट च्या लिंक्स तुम्हाला देऊ शकते, ज्या तीस-या पार्टी द्वारे मेंनटेन केल्या जातात, या लिंक्स फक्त ग्राहकांच्या सोयी-सुविधा साठी दिल्या जातात, त्याचा अर्थ असा होत नाही की RPSL या वेबसाईटस्ना प्रोत्साहन देते, किंवा त्यांच्या प्राडक्टस आणि सर्व्हिसेसनां प्रोत्साहित करते, ग्राहकांना माहित आहे आणि ते हे मान्या करतील की RPSL याला जबाबदार नाही, आणि/किंवा कोणत्याही माहितीची, जसे त्यावरी मजकूर / उत्पादन / प्रोडक्टस/सर्व्हिसेस इत्यादि, तीस-या पार्टीच्या वेबसाईटस् वर उपलब्ध आहे म्हणून आम्ही त्याला जबाबदारी नाही, ग्राहकाची जबाबदारी आहे की, त्यानी अशा सर्व्हिसेस प्राप्त करण्यापुर्वी, आवश्यक ती खातरी पटवून घ्यावी..

(g) कोणताही वाद, तक्रार व्यापा-या विरुध झाला तर, तो ग्राहकांनी आणि व्यापारी संकुलाने आपसात मिटवावा, हे स्पष्ट केलेच आहे की RPSL याची अजिबात जबाबदारी घेणार नाही, किंवा भरपाई करून देणार नाही, ती बाब वस्तुंच्या दर्जा संबंधी असो आणि/किंवा सेवा संबंधी असो, ज्या ग्राहकाने अशा व्यापा-याकडून घेतली आहेत, जे जिओ मनी अकाउंट चा वापर करतात, जरी हे उत्पादन किंवा सर्व्हिसेस RPSL ने आपल्या व्यापा-यांना प्रोमोशनल स्कीम्स अतंर्गत दिल्या असतील, ही ग्राहकाची जबाबदारी आहे की, त्यांनी वस्तुंच्या दर्जा, क्वॉलिटी संबंधी खात्री करुन घ्यावी, तसेच वस्तुंची मात्रा आणि त्यांची योग्यता इत्यादी बाबींची खात्री करुन घेणे, ही ग्राहकाची जबाबदारी आहे, तसेच सेवा विषयी हे सर्व खरेदी पुर्वी करावे.

(h) RPSL तर्फे, जेप्रोत्साहित फायदे आणि इतर फायदे जे प्रोमोशनल स्कीम्स अतंर्गत दिले जातात, ते लागू कायद्याशी बाधिल असतात, त्यामुळे ते मिळतीलच याची खात्री नसते.

(i) ग्राहकाला हे पुर्णतः माहित आणि मान्य आहे की, त्याने दिलेली कागद-पत्रे, जी RPSL कडे जमा आहेत, तिचा वापर RPSL , आपल्या ग्रुपशी शेअर करेल. KYC ची कागद-पत्रे जी RPSL कडे आहेत ती RPSL आपल्या ग्रुपशी शेअर करेल, ज्यामध्ये पेमेंट करणा-या बॅंकेंचा समावेश असेल. तसेच ग्राहकाला हे माहित असल्यामुळे, त्यांना काही आक्षेप नाही आणि तो RPSL ला याची परवानगी देतो की, त्यांनी ग्राहक-डाटा वापरावा, ज्यामध्ये enter-alia जी ओळख-पत्राची प्रमाणित प्रत आहे, तसेच जो पत्ता RPSL ला दिला आहे तो RPSL च्या ग्रुप-कंपनींना दिला जाईल, आणि ती माहिती त्यांचे सहकारी वापरतील, ज्यामुळे KYC च्या गरजांची पुर्तता होईल. (ज्यामध्ये याचा सुध्दा समावेश आहे की, कोण्या बॅंकेत त्यांचे खाते उघडता येईल जी ग्राहकाला पेमेंट करेल.)

(j) ग्राहक याची पुष्टी करतो की, तो उत्पादनाचे निर्माण स्वतः करणार नाही, तसेच विक्री, रिसेल, डुप्लिकेट कॉपी करून सर्व्हिसेसचा गैर-वापर कोणत्याही कमर्शियल उद्देशाने करणार नाही.

## ४. रिझर्व्हेशन्स

(a) ग्राहका विषयी अचुक आणि ताजी माहिती जमा करणे, तपासने, ऑडिट करणे आणि मेंनटेन करणे ही एक नियमित सुरू राहणारी प्रक्रिया आहे, याचे अधिकार RPSL कडे रिझर्व्ह आहेत, कोणत्याही क्षणी आवश्यक पाऊले उचलण्यासाठी, म्हणजे सर्व संबंधित लागू KYC च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले जाईल.

(b) RPSL ला सस्पेन्ड करण्याचे आणि/किंवा जिओ मनी सर्व्हिसेस बंद करण्याचे, किंवा जिओ मनी अकाउंट बंद करण्याचे, कोणत्याही क्षणी, ग्राहकाला अगोदर खबरदारीची नोटीस अगोदर दिल्या बिना, कोणत्याही कारणास्तव, ज्यामध्ये या गोष्टींचा अमर्यादित समावेश आहे (अ) कोणत्याही कायद्याचे, नियमाचे, आदेशाचे, मार्गदर्शनाचे, निवेदनाचे उल्लंघण करणे, जे RBI ने ग्राहकांसाठी वेळोवेळी काढले आहेत, किंवा कोणत्याही अटी-शर्तीचे उल्लंघण करणे जे कोणत्याही लागू कायद्याच्या पालन करण्या संदर्भात आहेत (ब) कोणतीही विसंगती, किंवा विसंगतीची शंका येणे, त्या माहितीच्या तपशीली विषयी जी जमा केली आहे, किंवा KYC च्या कागद-पत्रात विसंगती, किंवा जे CAF ग्राहकाने दिले आहेत त्यात विसंगती, किंवा या सर्व बाबी विषयी RPSL ला खात्री न पटल्यामुळे. (क) धोका देण्याच्या क्षमतेला भिडण्यासाठी, बिगाड होण्याची शक्यता टाळण्यासाठी, जाणून-बुजून वाटोळा करण्याची वृती टाळण्यासाठी, देशाच्या सुरक्षेला धोका पोहोचू नये यासाठी, किंवा दुस-या अन्य कारणामुळे (ज्याची सविस्तर माहिती क्लाऊज १० मध्ये दिली आहे) इत्यादी (ख) टेक्निकल विफलता, आधुनिकता वाढविण्यासाठी, विविधता आणण्यासाठी, जागा बदलणे दुरुस्ती, मेन्टेनेन्स आणि/किंवा कार्यक्षमता वाढविण्यासाठी (ग) जर टेलिकॉम सर्व्हिसेस प्रोव्हाईडर्स चे कनेक्शन, ज्याच्याशी ग्राहकाचे जिओ मनी अकाउंट जोडलेले आहे, आढळले की बंद आहे, किंवा ते ग्राहकाच्या ताब्यात आहे किंवा अकाउंट वर अनाधिकृत ताबा आहे, कारण काही ही असो, आणि/किंवा (घ) ग्राहकाची अक्षमता, ती कोणत्याही प्रकारची असो, जी RPSL ने आवश्यक ठरविलेली आहे, तरी देखील अशा सास्पेन्शन पुर्वी जिओ मनी सर्व्हिसेस खंडित करण्यापुर्वी ग्राहक, पुर्णतः RPSL च्या विवेका वर आवलंबून असेल, आणि लागू कायद्या-विषयी जबाबदार राहील, ग्राहकाला क्षमता प्रदान केली जाईल, म्हणजे तो बदली करू शकेल आणि/किंवा मध्य-वाट शोधुन काढेल, ज्याची सुविधा जिओ मनी अकाउंट मध्ये ठेवली आहे.

(c) RPSL ला अधिकार आहेत की, ते CAF ला कोणत्याही क्षणी रद्द करु शकते, तसेच ग्राहकाची कोणतीही कागद-पत्रे रद्द करू शकते, याचा त्यांना पुर्णतः अधिकार आहे.

(d) RPSL ने हे अधिकार आपल्याकडे रिझर्व्ह ठेवले आहेत की, ती CAF आणि इतर कागद-पत्रे, फोटो इत्यादी जे जमा आहेत, आपल्याकडे ठेवू शकते.RPSL कडे हे अधिकार रिझर्व्ह आहेत की, ते ट्रान्झॅक्शन रद्द करू शकते, अशा वेळी जेंव्हा कोणतेही नेटवर्क विफल ठरेल, अशा केसेस मध्ये किंवा दुस-या अन्य कारणास्तव, जे RPSL च्या कंट्रोल-बाहेरचे आहेत, तेथे उशीर किंवा कार्यात विफलता मिळू शकते, ट्रान्झॅक्शन मध्ये उशीर झाल्यामुळे किंवा सिस्टम फेल झाल्यामुळे होणा-या नुकसानीला RPSL जबाबदार राहणार नाही. कारण RPSL तुम्हाला वेबसाईट सुविधा किंवा मोबाईल ॲप्स आणि सॉफ्टवेअर टेक्नॉलाजी आणि सर्व्हिसेस पूर्णवेळ, सलग, अखंडित, सुरळीत प्रदान करते ''जसे आहे तसे'' ''जेथ आहे तेथे'' सर्व फाल्टससह या बेसिसवर, परंतु याची खात्री देत नाही की वेबसाईट किंवा मोबाईल ॲप किंवा दुसरे एखादे त्यांचे सॉफ्टवेअर अचुकपणे सलग काम करतील, हे सर्व नेहमी प्रयाप्त आणि आपल्या हद्दीत असते, किंवा प्रत्येक चुक दुरुस्त केली जाऊ शकते, तसेच RPSL याची जबाबदारी सुध्दा घेत नाही की, जी वेबसाईट ची सुविधा आणि इतर अशा सुविधा तुम्हाला प्राप्त आहेत, त्या वायरस-फ्री असतील असे नाही, वर्मस किंवा दुसरे कोड, ईजा पोहोचिणारे असू शकतात.

(e) अशा परिस्थितीत, जेंव्हा असे ट्रान्झॅक्शन होईल ज्याला एक प्रकारचा धोका म्हटले जाते किंवा शंका येते, किंवा कोणी ते इच्छित नाही तर, RPSL ला अधिकार प्राप्त आहेत की ते ट्रान्झॅक्शनला-फ्रीज करू शकते, अशा जिओ मनी अकाउंटस मध्ये/ जिओ मनी अकाउंट बंद करणे, ज्यामध्ये अधिका-यांना माहिती देणे, ज्याची गरज पडु शकते, जे योग्य आणि उपयुक्त समझले जाईल RPSL ते करील.

(f) RPSL ला हे अधिकार प्राप्त आहेत की ती आपली सेवा खंडित करू शकते आणि/किंवा CAF ला कोणत्याही क्षणी रद्द करू शकते. त्यांच्या संपुर्ण विवेकानुसार, मिळालेल्या माहितीतील विसंगतीमुळे, जी माहिती ग्राहकाने स्वत: पुरविली आहे, तसेच जी तपशील दिली आहेत त्यात तफावत आढळल्यास, त्या कागद-पत्रा द्वारे जी KYC ने जमा केली आहेत, म्हणजे CAF आणि KYC मधील माहिती मॅच नाही झाली तर, या विषयी अशा प्रकारच्या केसेस मध्ये RPSL ने आपले अधिकार रिझर्व्ह ठेवले आहेत, आणि ते योग्य कारवाई करू शकतात. आणि कोणत्याही परिस्थितीत त्यामुळे होणा-या नुकसान-भरपाई करून देणार नाही.

(g) जिओ मनी अकाउंट मध्ये जेंव्हा शिल्लक शुन्य असेल, अशावेळी लागू कायद्यानुसार कारवाई केली जाईल, अश वेळी ग्राहक RPSL कडे निवेदन करू शकतो की, आमचे जिओ मनी खाते बंद केले जावे, तरी देखील हे स्पष्ट केले जाते की कोणत्याही परिस्थितीत कसलीच रक्कम जिओ मनी अकाउंट मधून काढता येणार नाह,. ग्राहका कडे परत केली जाणार नाही, किंवा याची हमी देता येणार नाही, फक्त अशावेळी ते शक्य होईल, जेंव्हा लागू कायद्यात त्याची तरतूद असेल.

५. **विशेष सर्व्हिसेस**

(a) ग्राहकाला हे मान्य आहे की, बुकिंग-सुविधा/खरेदी, टिकिट बुकिंग/सेवा/ वेगवेगळ्या प्रकारचे अत्पादन, बस सर्व्हिसेस/हॉटेल्स/ट्रेन्स किंवा इतर सर्व्हिसेस RPSL प्रदान करू शकते, ही सर्व्हिसेस, RPSL तर्फे जिओ मनी वालेट (विशेष सर्व्हिसेस) वर तीस-या पार्टी द्वारे ग्राहकांच्या सोयी-सुविधांसाठी उपलब्ध करून देऊ शकते, परंतु त्याचबरोबर RPSL अधिकार आहे की, या विषयी होणा-या अडी-अडचणी, नुकसान-भरपाई इत्यादि ला ते जबाबदार राहणार नाही.

(b) ग्राहकाला हे मान्य आहे की RPSL हे कार्य/सुविधा/उत्पादन आणि अशा स्पेशल सेवा स्वत: करत नाही, तसेच तो एजंट ही नाही, किंवा अशा सेवा-सुविधा स्वत: प्रदान करणारा नाही.

(c) ग्राहकाला हे मान्य आहे की तो या विशेष सर्व्हिसेसचा वापर स्वत:च्या विवेकाने आणि जबाबदारीने करेल, त्यामुळे होणा-या नुकसानाला तो स्वत:च जबाबदार असेल, जे ट्रान्झॅक्शन या संदर्भात होईल, त्याची सर्व जबाबदारी ग्राहकावर असेल, ग्राहकाला हे मान्य आहे की, विशेष सर्व्हिसेस संबंधी जी असुविधा उशीर किंवा कोणत्याही कारणाने जसे, बुकिंग कॅन्सल होणे, सेवा खंडित होणे, कर्मचा-याचे वर्तन, त्यामुळे होणारा त्रास, वस्तूंचे नुकसान, आणि/किंवा दुसरे इतर नुकसान, जखमी होणे, या आणि अशा प्रकारच्या सेवेत होणा-या गैरप्रकाराला फक्त ग्राहकच जबाबदार असेल, RPSL त्याला अजिबात जबाबदार राहणार नाही. ग्राहकाला हे मान्य आहे की तो RPSL ला नुकसान-भरपाई करून देईल, जे नुकसान कोणत्याही कारणाने झाले असो.

(d) ग्राहक, विशेष सर्व्हिसेस संबंधी सर्व अटी-शर्ती चे पालन करेल, जे प्रोव्हाइडर्स / ऑपरेटर्स / तीसरी पार्टी सर्व्हिसेस विषयी, तसेच स्पेशल सर्व्हिसेस रद्द करण्या संबंधित असतील ज्यामध्ये रद्द आकार, तक्रार मिटविने इत्यादी जे सरळ-सरळ विशेष सेवा प्रोव्हाईडर्स / ऑपरेटर्स संबंधित आहेत.

(e) ग्राहकाला हे मान्य आहे की, व्यापारी संकुल कोणतीही सुविधा, डिस्काउंट कूपन्स आणि/किंवा या सारख्या सुविधा प्रदान करू शकते, ग्राहक या सुविधा घेऊ शकतो, परंतु त्याची पूर्णत: जबाबदारी, तसेच त्यामुळे होणारे तोटे नुकसान, यांना ग्राहक स्वत:च्या विवेकाने स्विकारेल. त्याला RPSL कदापि जबाबदार राहणार नाही, किंवा नुकसान भरपाई, ताबा घेणे-देणे, अथवा कसलेही इतर नुकसान जे झाले असेल त्याला जबाबदार राहणार नाही. ती जबाबदारी ग्राहकाची राहील. ग्राहकाला हे मान्य आहे की ज्या सुविधा व्यापारी संकुलाने दिल्या किंवा त्यांचे आश्वासन दिले, किंवा डिस्काऊंट दिले / स्कीम जाहीर केल्या, त्या विषयी तो व्यापारी, सर्व्हिस प्रोव्हाइडर, होणा-या नुकसानाला / त्रासाला जबाबदार असेल, आणि नुकसान-भरपाई त्यांच्या कडून केली जाऊ शकते, ते तुम्ही पाहून घ्यावे RPSL वर याची अजिबात जबाबदारी नाही.

(f) ग्राहकाने, RPSL ला पुर्ण मान्यता आणि अधिकार दिले आहेत की, ते जिओ मनी अकाउंट चा वापर, व्यापारी संकुल बरोबर शेअरिंग मध्ये करू शकते, ग्राहकाची याला हरकत नाही.

(g) RPSL ग्राहकासाठी स्कीमस आणि आफर्सची घोषणा करू शकते (ऑफर) परंतु हे तिच्या विवेकावर वेळोवेळी होणारी बाब आहे, जी ऑफर्सच्या अटींशी निगडित असेल, RPSL ला हे अधिकार आहेत की, ती ऑफर्स रद्द देखिल करू शकते. किंवा ग्राहकाला त्या ऑफर्सच्या फायद्यांपासून वंचित ठेऊ शकते, जर RPSL च्या अशे लक्षात आले की, ग्राहक त्या सुविधांचा गैरवापर, धोका, किंवा संशयित कार्यांसाठी करत आहे.

६. **आकार**

जिओ मनी अकाउंटचा वापर आणि मेंनटेनेन्स, ज्यामध्ये जिओ मोबाईल ॲपचा समावेश आहे, ज्याचा सेवाशुल्क ग्राहकाला त्या प्रमाणे भरायचा आहे जसे RPSL ने आपल्या वेबसाईट (www.jiomoney.com) वर दर्शविले आहे. हे वेळोवेळी सांगितले जाते की, जे आकार असतील त्यात ॲपलिकेशन टॅक्सेस आणि डयूटीज, सेस यांचा समावेश राहील. ग्राहकाने RPSL ला पुर्णत: परवानगी दिली आहे की, त्याच्या जिओ खात्यातून वेळोवेळी पैसे कापले जातील, याला ग्राहकाचा अजिबात आक्षेप नसेल, ही कपात वेळोवेळी गरजेनुसार आणि मात्रेनुसार, तसेच जिओ मनी अकाउंट वापरासाठीचा कर म्हणून, जेंव्हा RPSL ला वाटेल केली जात राहील.

७. **मर्यादा**

ट्रान्झॅक्शन आणि ट्रान्झॅक्शन-मर्यादा, जिओ मनी अकाउंट वापरण्यासाठी कशी, केंव्हा असावी हे ठरविण्याचे पुर्णत: अधिकार RPSL कडे रिसर्व्ह आहेत, ज्या मध्ये लागू कायद्यांचे पालन केले जाईल, तसेच वेळोवेळी सुधार केला जाईल, या आणि अशा ट्रॅन्झॅक्शन आणि ट्रान्झॅक्शन-मर्यादाची, माहिती आमच्या ग्राहकाला वेबसाईट वर पोस्ट-द्वारे दिली जाईल. वेबसाईट ( www.jiomoney.com )

८. **नुकसान-भरपाई**

ग्राहकाला हे मान्य आहे की तो, त्याच्याकडून होणा-या नुकसानाची/खर्चाची, टूट-फूट ची संपूर्ण भरपाई RPSL ला देईल, तसेच ग्राहकाने जेंव्हा RPSL ला सुरक्षित ठेवणे, त्याचबरोबर ग्राहक, डीलर्स / डिस्ट्रिब्यूटर्स ला सुरक्षित ठेवणे आणि त्यांना ईजा/त्रास, कोणताही दावा, या सर्वांच्या विरुध्द करणार नाही हे स्विकारले आहे. नुकसान भरपाई दावा संदर्भात, टूट-फूट, आणि खर्च, ज्यामध्ये कायदे-फी, वकील-फी आणि इतर खर्च जे त्याच्या स्वत:च्या वापरामुळे किंवा जिओ मनी सर्व्हिसेसच्या गैर-वापरामुळे, झाले असतील, त्या सर्व नुकसानाची ची भरपाई, ग्राहक मागणार नाही, डीलर्स आणि RPSL याला जबाबदार नसतील, या अटी-शर्तींचे उल्लंघन किंवा वॉरंटीज आणि सुविधा, ज्या ग्राहकाने प्राप्त केल्या आहेत त्यांची नुकसानभरपाई RPSL ला करून देईल, जर ग्राहकाने RPSL शी संभाषणात काही गैर-प्रकार केला, धोका किंवा कसला गैरवापर, ज्यामुळे RPSL ला त्रास / नुकसान झाले, ज्याचे कारण ग्राहकाची अक्षमता, निष्काळजीपणा, चुकीची माहिती देणे, किंवा संभाषण स्थळाची चुकीची माहिती देणे, आणि/किंवा ग्राहकातर्फे होणा-या बदलाची माहिती न देणे, तसेच ग्राहकाच्या नेहमीच्या पत्त्यात होणा-या बदलांची माहिती न देणे इत्यादि बाबींचा समावेश आहे.

९. **अटी मध्ये बदल**

येथे सर्व अटी-शर्तींचे नियम लागू कायद्याशी निगडित राहतील, तसेच त्यांमध्ये RPSL बदल करू शकतो, या अटी-शर्तीमध्ये सुधार, नाविण्य आणु शकतो, हे वेळोवेळी होऊ शकते, तसेच हे होणारे बदल तुम्हाला आमच्या वेबसाईट (www.jiomoney.com) वर दाखविले जातात ही ग्राहकाची जबाबदारी आहे की त्याने/तिने स्वत:ला अपडेट ठेवावे, होणा-या अटी-शर्ती विषयी बदलांची माहिती ठेवावी, जे व्यवहार ग्राकांशी केले जातील, त्यामध्ये हे गृहीत धरले जाईल की, ग्राहकाला अटी-शर्ती मध्ये बदलांची जाणीव आहे आणि ते बदल ग्राहकाला मान्य आहेत, RPSL कडे हा अधिकार राखिव आहे की, ते कोणतेही कारण न सांगता, कधीही जिओ मनी सर्व्हिसेस सेवा बंद करू शकतो. बरायच बाबी आमच्या आतील पॉलिसीज किंवा ॲपलिकेशन कायद्यातील बदलांमुळे घडू शकतात.

१०. **मिळकत आणि मालकी-हक्कांचे अधिकार**

ग्राहकाने हे मान्य केले आहे की, त्याला/तिला दावा करण्याचा/हक्क मागण्याचा कसलाच अधिकार मिळालेला नाही, जिओ मनी अकाउंट संदर्भातील, बुध्दीमत्ता मिळकती विषयी, जे या सर्व्हिसेसच्या वापरामुळे त्यांना भेडसाऊ शकतो, ग्राहक या पासून स्वत:ला वेगळे करतील, आणि त्या बुध्दीमत्ते वर आपल्या अधिकाराचा दावा करणार नाही, त्याचबरोबर ग्राहक हे मान्य करतो की तो/ती कसल्याच प्रकारच्या सुधारांचे, बदलांचे, अर्थ देण्याचे कमी-जास्ती करण्याचे, खाड-खोड करण्याचे, सार्फवेअर मध्ये चेंज, अल्ट्रेशन, मोबाईल ॲप मध्ये बदल, किंवा अशा उत्पदनांचे संकेत जे RPSL च्या विरोधात केले जाणारे, कोणतेही कृत्य करणार नाही, ग्राहकाला हे कळले आहे की, युजर इंटरफेस, ग्राफिक्स, लोगो, सर्व्हिसेस, सॉफ्ट-वेअर आणि दुस-या इतर बाबी, ज्या जिओ मनी सर्व्हिसेसशी निगडित आहेत, त्यांचे रक्षण करेल, कॉपी-राइटस्, डिझाईन, पॅटेन्ट आणि ट्रेडमार्कस् नियम कायदे आणि इतर बुध्दीमत्ता संबंधित मिळकतीचे संपूर्ण हक्क RPSL आणि त्यांच्याशी जुडलेल्या पार्टीचे आहेत.

११. **एकत्रित शक्ती**

RPSL ग्राहकांना एकत्रित शक्तीच्या ॲक्शनची माहिती देईल, आणि त्या संदर्भात योग्य पाऊले उचलेल, म्हणजे ग्राहकांच्या संपर्कात राहून, तिढा सोडविण्यासाठी योग्य ती कारवाई करेल. एकत्रित सांघिक शक्ती वापर म्हणजे कोणतीही अशी घटना, कोणत्याही कारणाने घटली असो, जी RPSL च्या नेहमीच्या कंट्रोल बाहेरची, किंवा त्यांच्या सहकारी संस्थाच्या आवक्या बाहेरची असेल, जसे बॅंक्स् ज्यामध्ये समावेश आहे परंतु मर्यादित नाही, कम्युनिकेशन सिस्टम प्रयाप्ते नसने, कार्य-प्रणाली मध्ये बिघाड/वायरस इत्यादी चा अडथळा निर्माण होणे, किंवा पेमेंट प्रणाली मध्ये बिघाड होणे, हल्ला होणे, आग लागणे, वादळ, पूर, स्फोट होणे, देवाचा प्रकोप, जमाव अडथला, बंद पुकारणे, हडताळ किंवा कारखान्याचा कोणत्याही प्रकारचा निर्णय, धाड पडणे, लढाई, सरकारचे ॲक्शन घेणे, कम्प्युटर हॅकिंग, कम्प्युटर-डेटा वर अनाधिकृत ताबा होणे, तसेच स्टोरेज साधनांवर कम्प्यूटर क्रॅश होणे, सुरक्षा मध्ये बिघाड होणे, इत्यादी, अशा परिस्थितीत, जेंव्हा एकत्रित शक्तीचा वापर केला जाईल, त्यामुळे होणा-या RPSL च्या सर्व्हिसेस मध्ये, जी बाधा निर्माण होईल, कार्य झाले असो किंवा नसो, परंतु त्या ॲक्शन काळात ज्या सुविधा पासून तुम्ही वंचित राहाल, त्यामुळे ग्राहकांचे जे नुकसान होईल, त्या करिता RPSL जबाबदा-या पासून मुक्त राहिल, जो पर्यंत हे कार्य म्हणजे एकत्रित शक्ती वापर सुरु राहील.

१२. **अकाउंटची संपुष्टी**

जिओ मनी वालेट, १२ महीन्या पर्यंत वैध्य राहील, (१) लागू तारखे पासून (२) ग्राहकांचे शेवटचे आर्थिक व्यवहार, या पैकी जे उशीरा असेल तेंव्हा पासून, तसेच जी रक्कम जिओ मनी वालेट मध्ये शिल्लक असेल, ती जप्त केली जाईल, किंवा त्याविषयी RPSL आपला निर्णय विवेकाने घेईल, अशा परिस्थितीत ग्राहकाला ३० (तीस) दिवसांची मुदत नोटीस दिली जाईल, जी RBI च्या मार्गदर्शक सूचनांवर आधारित असेल, म्हणजे जिओ मनी अकाउंट बंद करून त्यातील रक्कम जप्त करण्यापूर्वी, जर ग्राहकाचा मृत्यू झाला तर कायद्यानुसार जो वारस असेल, तो RPSL च्या पॉलिसी प्रमाणे ग्राहकाची जागा घेऊ शकतो, त्या वारसाला आपली आवश्यक कागद-पत्रे जमा करावी लागतील, ही RPSL गरज आहे. म्हणजे कायद्यानुसार वारसदाराला त्याचा दावा सिध्द करण्यात यश मिळावे, आणि ही RPSL ची पॉलिसी आहे.

१३. **सर्व्हिसेसचा दर्जा**

ग्राहकाला हे मान्य आहे की, कोणत्याही सर्व्हिसेसेच्या आयोग्यतेला, जसे वस्तुंची वेळेवर डिलेव्हरी न होणे, जी व्यापा-यांची जबाबदारी असते, अशा प्रकारच्या तक्रारींना RPSL जबाबदार नाही, ही ग्राहकाची जबाबदारी आहे त्याने व्यापा-याना तक्रार करावी, आणि त्या दोघांनी मिळून मार्ग काढावा, जेणे करून ग्राहकाचे डिलेव्हरी विषयींचे, किंवा वस्तुंचा दर्जा संबंधित प्रश्न मिटतील परंतु RPSL ला जबाबदार धरता येणार नाही. RPSL हे आवश्य करेल की काय कारणे आहेत, ज्यामुळे योग्य प्रकारे वस्तुंची डिलेव्हरी होत नाही, आणि त्यावर काय उपाय असू शकतात, आपल्या सर्व बिजनेस पार्टीज बरोबर सभा घेऊन, हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, ही अशी आमची पॉलिसी आहे. आमच्या या चौकशीत जे आढळून येईल, किंवा त्या विषयी आमचा म्हणजे RPSL चा जो निर्णय असेल तो ग्राहकांना मान्य करावा लागेल, तक्रारींची दखल घेणे, त्या करिता आमच्याकडे एक प्रणाली उपलब्ध आहे, ज्याद्वारे आम्ही निश्चित योग्य उपाय शोधून काढू शकतो, तसेच कोणताही विषय हाताबाहेर जाऊ नये म्हणून, मॅट्रिक्सची सुविधा आहे, जे अर्ज केल्यास प्राप्त होते, जेंव्हा काही तक्रारी असतील तुम्ही ''नोडल अधिका-याला'' या पत्त्यावर nodaloffice.jiomoney@ril.com, भेटू शकता, तसेच RPSL तीस-या पार्टीला आमंत्रण देणार नाही की तुम्ही या आणि आमच्या ग्राकांचे प्रश्न जे व्यापा-या बरोबर आहेत ते सोडवा, आम्ही असे करणार नाहीत, तसेच स्वत: त्यांमध्ये मध्यस्थी करणार नाही, ते व्यापा-यांनी आणि आमच्या ग्राहकांनी आपसात मिटवून घ्यावी.

१४. **जबाबदारीची मर्यादा**

कोणत्याही परिस्थितीत आमची पूर्णत: जबाबदारी किंवा आमच्यातर्फे नुकसान भरपाई केली जाणार नाही, म्हणजे आमच्या सर्व्हिसेस वापरणा-या ग्राहकाच्या दाव्यामुळे किंवा त्या संदर्भात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे होणा-या कोणत्याही नुकसानाला आम्ही जबाबदार राहणार नाहीत, जरी ती बाब कोणत्याही प्रकारची असेल किंवा मोठी रक्कम असल्यामुळे वादाचा विषय असेल तरी देखील RPSL जबाबदारी स्विकारणार नाही (तसेच तीस-या पार्टीला जी ग्राहकाने पाठविली आहे मान्य करणार नाही) कोणतेही माध्यम, विशेष, प्रसंग, प्रतिकारक, किंवा नमूना प्रकारची बाब असो, जे नुकसान ग्राहकाच्या गैरवापरामुळे, सर्व्हिसेस वापर अक्षमतामुळे झाले त्याला ग्राहकच जबाबदार राहील. या शर्ती मध्ये पुढील मुद्यांचा समावेश आहे, बेनफा दावा, डाटा लॉस, गुडविल लॉस, काम थांबणे, कंम्प्यूटर फेल होणे किंवा कम्प्यूटर बिघाड, दुसरे इतर व्यवहारिक नुकसान किंवा तोटे, जरी RPSL ला माहित असेल किंवा त्याने माहित केले पाहिजे अशा स्वरुपाच्या संभाव्य नुकसानाची भरपाई केली जाणार नाही.

१५. **डिस्क्लेमर**

RPSL सर्व्हिसेस बंद करु शकतो, तसेच कार्य थांबवू शकतो, वेबसाईट आणि/किंवा मोबाईल ॲप, कोणत्याही कारणाने ज्याची अगोदर नोटीस दिली जाईल किंवा नाही, तसेच RPSL ला अधिकार आहेत की, ते आपल्या वेबसाईट वर कन्टेन्ट/माहिती आणि/किंवा मोबाईल ॲप वर आणि/किंवा अत्पादन काढू शकते, किंवा बड्लू शकते, जी सर्व्हिसेस अथवा प्रॉडक्टस वेबसाईट वर सुविधारूपी दिल्या आहेत, आणि/किंवा मोबाईल ॲपवर दाखविल्या आहेत, त्याचप्रमाणे आमच्या ग्राहकाला वागावे लागेल, तो स्वत:च्या विवेकाने निर्णय घेईल, त्याला तो घ्यावाच लागेल आणि RPSL त्यामुळे होणा-या नुकसानाला अजिबात जबाबदार राहणार नाही.

१६. **प्रायव्हेसी पॉलिसी**

ती सर्व माहिती जी RPSL कडे ग्राहकातर्फे जमा केली जाते, जसे रजिस्ट्रेशन तपशील, फायदे देणारे खाते, त्यांची तपशील आणि डेबिट/क्रेडिट कार्डची माहिती इत्यादी, हे सर्व प्रायव्हेसी पॉलिसीशी मिगडित आहे, जी आमच्या वेबसाईट वर प्रसारित झाली आहे आणि ती नेहमी अपडेट केली जाते.

१७. **करार**

RPSL ला अधिकार आहे की तो, आपले करार/ट्रान्सफर या सुविधा, तीस-या पार्टीला प्रदान करु शकते, ज्यामध्ये त्यांच्या ताब्यातील कंपनींचा समावेश आहे, सुविधा, सबसिडीज, फायदे प्राप्त करणारे सहकारी, तसेच आपल्या ग्रुप कंपनींना. त्याच प्रमाणे ग्राहकांनी मान्य केले आहे की, ते Novated viz-a-viz आपल्या कंपनीच्या मार्फत फायदे प्राप्त करणारे सबसिडी प्राप्त करणारे RPSL कंपन्या किंवा रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ज्यांना RBI तर्फे बॅंक पेमेंटचे लायसन, तसेच सेमी क्लोजड प्रिपेड इन्स्ट्रुमेंटस् चे लायसन्स दिले आहेत, किंवा दिले जाणार आहेत,/किंवा ट्रान्सफर केले जाणार आहेत, आणि ग्राहकाला हे बिना शर्त कबूल व मान्य आहे, म्हणजे ग्राहकाने यांवर आपली सहमती दर्शविली आहे, आणि हे सर्व लागू कायद्यांच्या चौकटीत राहून करावे लागणार आहे, त्या करिता RBI ची अगोदरच परवानगी घेणे अनिवार्य राहील. जिओ मनी वॉलेट आणि/किंवा जिओ मनी अकाउंट, किंवा कोणताही या संदर्भातील भाग RPSL तर्फे असाइन किंवा ट्रान्सफर केला जाईल, तो ग्राहकाला मान्य असेल, कोणत्याही व्यक्ती/व्यक्तींना ज्या मध्ये फायदे प्राप्त करणारे किंवा RPSL च्या ग्रुप कंपन्या असतील. त्या सर्वांसंदर्भात, बिना अट आपली सहमती ग्राहकाने दर्शविली आहे.

१८. **न्याय प्रणाली**

या सर्व अटी-शर्तीवर, भारत देशाच्या कायद्यानुसार लक्ष दिले जाईल, ज्या मध्ये कोणत्याही प्रकारचे देशाच्या कायद्यांचे, नियमाचे, तसेच विरोधांचे चित्र निर्माण होता कामा नये, यासाठी न्याय-निवाडा व्हावा, म्हणून मुंबई-कोर्ट न्याय प्रणाली या विषयी निर्णय घेईल. जर जिओ मनी सर्व्हिसेस आणि ग्राहकामध्ये वाद निर्माण झाला आणि ते आपसात मिटवू शकले नाहीत तर. ग्राहक, हे मान्य करतो की त्याने आमचा हा निर्णय मान्य केला आहे आणि तो याचे पालन करेल.

१९. **टर्म आणि टर्मिनेशन**

ग्राहकाने हे मान्य केले आहे की, या सर्व अटी-शर्ती तेंव्हा पर्यंत लागू राहतील जेंव्हा पर्यंत RPSL त्या अटी काढत नाही, RPSL ला हा अधिकार प्राप्त आहे की, तो या अटी-शर्ती कधीही काढू शकतो, RPSL त्यात बदल करु शकतो, हलवू शकतो, किंवा सर्व्हिसेसचा कोणताही भाग काढू शकतो, जो RPSL ने दिला आहे, तसेच ग्राकांना पूर्णत: काढून टाकण्याचा अधिकार सुध्दा RPSL कडे राखिव आहे, तसेच मेंबरशिप काढून टाकणे, ग्राहकांच्या खात्यांतील सर्व माहिती नाहिशी करणे, ज्याची कारणे समाविष्ट आहेत परंतु मर्यादित नाहीत, कोणत्याही गव्हर्निंग पॉलिसीचे किंवा लागू कायद्याचे उल्लंघन करणे.